सत्र खटला क्र. १२/२०२२
सरकार -वि- मोहम्मद शकिल
<u>निशाणी क्रमांक-६३</u>

## <u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.०६ याची जबानी</u>

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की

**माझे नांव - समाधान किसन तायडे,**

**वय - ५४ वर्ष, व्यवसाय – नोकरी ( पोलिस जमादार ),**

**राहणार - धामणगांव बढे.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

### <u>अभियोग पक्षातर्फे सरतपास विधिज्ञ श्री. एस. एच. जोशी.</u>

०१. दि.१४/१०/२०१७ रोजी मी पोलिस ठाणे धामणगांव बढे येथे पोलिस जमादार म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी मला गुन्हा क्र.१५७/२०१७ कलम ३५३, ३३२, ३४१, ५०६, ३४ भारतीय दंड संहितेची डायरी तपासकामी मिळाली. त्यानंतर मी तपास सुरू करून गुळभेली शिवारातील घटनास्थळाला पंचांसमक्ष भेट दिली. फिर्यादीने मला घटनास्थळ दाखविल्याप्रामणे मी तेथे घटनास्थळ पंचनामा तयार केला. पंचनामा मला दाखविला. तो तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. तो **निशाणी क्र.६१** वर आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यानंतर मी फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. त्यानंतर मी घटनेमधील वाहने जप्त केली. त्याचे जप्तीपत्रक मी पंचांसमक्ष तयार केले. जप्तीपत्रक मला दाखविले. ते तेच आहे. ते **निशाणी क्र.५८** वर **५९** वर आहे. त्यानंतर मी आरोपींना अटक केली. मी फिर्यादीच्या वैद्यकीय तपासणीसाठी

प्राथमिक आरोग्यकेंद्र धामणगांव बढे यांना पत्र दिले होते. सदर पत्र मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. ते **निशाणी क्र.६४** वर आहे. मला तपासादरम्यान फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त झाले होते. मी साक्षीदार अशोक मानसिंग चव्हाण याच्या बयानातील अधोरेखांकीत भाग-अ त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला. तो **निशाणी क्र.६५** वर आहे. तपास पुर्ण करून मी आरोपी विरूध्द न्यायालयामध्ये दोषारोप पत्र सादर केले. आरोपी न्यायालयासमक्ष हजर आहे. ते तेच आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. एस. डी. रावत.</u>**

०२. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ हे वनपरीक्षेत्राच्या बाहेरचे होते. घटनास्थळ पंचनामा गुळभेली गावाजवळ करण्यात आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनामा गुळभेली गावातील रस्त्यासमोर करण्यात आला. घटनास्थळ पंचनाम्याचे क्षेत्र वनपरीक्षेत्रामध्ये समाविष्ठ असल्याबाबत मी काही चौकशी केली नाही. घटनास्थळ हे वनपरीक्षेत्रामध्ये समाविष्ठ असल्याबाबत मी काही पुरावा एकत्रीत केला नाही. ज्या ठिकाणावरून वाळू आणण्यात आली होती त्या ठिकाणाला मी भेट दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोट्या फिर्यादीच्या आधारावर चुकीचा तपास केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रकरणामध्ये खोटे साक्षीदार तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे जबाब त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले नाही व निशाणी क्र.६५ हा देखील साक्षीदारांचे सांगण्याप्रमाणे नोंदविला नाही. संबंधीत वाळू ही परवाण्यासह वाहतूक करण्यात होती किंवा नाही याबाबत मी काही चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे

नाही की, मी आरोपींविरूध्द खोटी केस दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by RAJENDRAKUMAR BABASAHEB GIRI
Date: 2026.03.11 10:30:28 +0545

मलकापूर.
दिनांक – १०/०३/२०२६.

**(आर. बी. गिरी)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

- - - - -

## CERTIFICATE

I certify that this order P.D.F. uploaded is a true and correct copy of original signed order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | : | Adhoc District Judge – 1 & Additional Sessions Judge, Malkapur. |
| Name of Stenographer | : | Shri. V. S. Jadhav. (Junior Clerk) |
| Date of order | : | 10.03.2026. |
| Date of signed on order by Judicial Officer | : | 10.03.2026. |
| Date of uploading | : | 11.03.2026. |